# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

वाचा- 1-या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144 **कावी** दि.31/03/2020 व 13/04/2020

2-या कार्यालयाचे आदेश जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/कावी- दिनांक 06/04/2020 व दि.13/04/2020

3- महाराष्ट्र शासनाची अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1दि.13/04/2020.

4- महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.17/04/2020.

---

जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/कावी- दिनांक.19.04.2020

आदेश:-

**ज्याअर्थी**, जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) हा विषाणू मूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषत केला आहे. कोरानाग्रसत रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवू नये म्हणुन सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक निर्माण होऊ शकतो या मुळे फौजदारी प्रकीया संहिता 1973 चे कलम 144(1)(3) अन्वये संपुर्ण जिल्हयामध्ये संचारबंदी लागु झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

तसेच खरीब हंगाम हा जवळ येत असल्यामुळे संदर्भीय क्र.4 नुसार आदेश निर्गमीत करुन भाजीपाल्याची विक्री व किराणामाल दुकाने आदेशात नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार एक दिवस आड याप्रमाणे दुकाने चालु ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच संदर्भ क्र.5 च्या अधिसुचनेत किराणामाल विक्री करणारे दुकाणे व भाजीपाला विक्री सुरु करणे बाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्याअर्थी मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हिंगोली खालील प्रमाणे **किराणा माल विक्री दुकाने, भाजीपाला विक्री करणारे दुकाने, दुध विक्री केंद्र, परवाना असलेले चिकन /मटन शॉप, बेकरी ,स्वीट मार्ट संबंधीत दुकाने प्रतिदिन सकाळी 9.00 ते दु 1.00 या वेळेतच सुरु** करण्याची परवानगी देत आहे.

**सदरील उदयोग सुरु करते वेळेस खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.**

1. संबंधितानी दिनांक .20/04/2020 पासुन दुकानाची सुरुवात करताना संपुर्ण जागेचे सेनिटायझेशन करुनच सुरुवात करावी.
2. दुकानातील कामगार/खरेदीदार यांची नोंद ठेवणे गरजेचे आहे जसे की, नाव, संर्पकाचा पत्ता व मोबाईल क्रमांक.
3. दुकानदारानी व त्यांच्या सोबत काम करणा-या कामगारांनी नेहमीच नाक आणि तोंड माक्सने पुर्णपणे झाकुन ठेवणे बंधनकारक आहे.
4. खरेदी करण्यासाठी आलेल्या दोन ग्राहाकामध्ये एक मिटरचे अंतर राहील यांची दक्षता संबधीत विक्रेत्यांनी घ्यावी. तसेच Sanitizer उपलब्ध ठेवण्यात यावेत.
5. तसेच खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांसाठी दु कानासमोर एक मिटरचे अंतरांनी गोल/चौकोन आखावेत.
6. दररोज कामावर येणा-या कामगारांची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी.
7. दुकानदारांनी कामगारासाठी मास्क व Sanitizer उपलब्ध करुन देण्यात यावेत.
8. दुकानाच्या परिसरामध्ये कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व साबण यांची व्यवस्था करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील यांची दक्षता घेण्यात यावी.
9. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करुन उदयोग धंदयाच्या ठिकाणी व परीसरामध्ये सामाजीक अंतराचे ( social Distance ) पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षततेच्या उपाय योजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.



Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दूरध्वनी-02456 221450

या आदेशामध्ये नमुद कालावधी वगळता इतर कालावधीमध्ये कोणासही घराच्या बाहेर पडता येणार नाही.तसेच आदेशाचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल यांची दक्षता घ्यावी.

संबंधित आयोजक तसेच आस्थापना मालक/चालक/व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, उप विभागीय दंडाधिकारी, तालूका कार्यकारी दंडाधिकारी, पोलीस स्टेशन, सर्व जि.हिंगोली यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

हे आदेश दिनांक.19/04/2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
(रुचेश जयवंशी)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण हिंगोली**

प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर

1.मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-32.
2.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

प्रतिलीपी – आवश्यक कार्यवाहीस्तव

1.पोलीस अधिक्षक हिंगोली
2.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली
3.उपविभागीय दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत
4.उपायुक्त पशुसर्वधन , हिंगोली.
5.मस्त्य व्यवसाय अधिकारी हिंगोली.
4.जिल्हा निबंधक सहकारी संस्था हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
5.उपविभागीय पोलीस अधिकारी / पोलीस निरिक्षक सर्व यांना (मार्फत पोलीस अधिक्षक हिंगोली).
6.तालुका दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/सेनगाव/वसमत/औंढा ना. यांना देवुन आदेशीत करण्यात येते की, आदेशात नमुद केल्या प्रमाणे आपल्या स्तरावरुन कार्यवाही अनुसरण्यात यावी.
7.मुख्याधिकारी नगरपालीका/नगर पंचायत हिंगोली/वसमत/कळमनुरी/सेनगांव/औंढा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
8.जिल्हा माहीती अधिकारी हिंगोली यांना प्रसिधीस्तव.

(रुचेश जयवंशी)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण हिंगोली**



Scanned with CamScanner